**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**

दिनांक :-३१/०८/२

**कोटेशन नोटीस**

भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि.०७/०९/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा आधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोटेशन सादर करताना सोबत पॅन क्रमांक, वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर सादर करणे बंधनकारक आहे.

---

**सन २०२६ च्या सार्वजनिक गणेशोत्सव कालावधीत उपाययोजना म्हणुन विसर्जन घाटांवर फराना, फोर्कक्लीप व रुग्णवाहिका वाहने भाडेतत्त्वावर इंधन व वाहनचालकासह खालील प्रमाणे पुरविणे.**

१) दि.१९/०९/२०२६ (रोजी ०५ दिवसीय) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चर्तुर्थी- १० दिवसीय) या दोन दिवसांकरिता दुपारी १२.०० ते पहाटे ४.०० वाजेपर्यंत प्रति दिवस १६ तासांकरिता टिळकघाट, व-हाळदेवी घाट, भादवड घाट, नारपोली घाट व शेलार घाटावर प्रत्येकी १ फराना व पोलिस नियंत्रण कक्ष यांना २ फराना याप्रमाणे ०७ फराना वाहने पुरविणे.

२) दि.१५/०९/२०२६ रोजी (१½ दिवसीय) विसर्जन दिवशी पोलिस नियंत्रण कक्ष यांना दुपारी १२.०० ते पहाटे १२.०० वाजेपर्यंत प्रति दिवस १२ तासांकरिता ०२ फराना वाहने पुरविणे..

३) दि.१९/०९/२०२६ (रोजी ०५ दिवसीय) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चर्तुर्थी- १० दिवसीय) या दोन दिवसांकरिता दुपारी १२.०० ते पहाटे ४.०० वाजेपर्यंत प्रति दिवस १६ तासांकरिता व-हाळदेवी घाट, व शेलार घाटावर प्रत्येकी १ फोर्कक्लिप प्रमाणे २ फोर्कक्लिप वाहने इंधन व वाहनचालकासह पुरविणे.

४) दि.१५/०९/२०२६ रोजी (१½ दिवसीय) दि.१९/०९/२०२६ रोजी (०५ दिवसीय) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चर्तुर्थी- १० दिवसीय) या दिवशी १)टिळकघाट, २)शेलार घाट, ३) वऱ्हाळदेवी घाट, ४) भादवड तलाव, ५) नारपोली तलाव ६) फेणे तलाव या विर्सजन घाटांवर प्रत्येकी एक याप्रमाणे ६ खाजगी रुग्णवाहिका प्रति दिवस २४ तासांकरीता पुरविणे.

**उप अभियंता (यांत्रिकी) तथा**
**वाहन विभाग प्रमुख**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

---

दिनांक ३१ /०८/२०२६
खालील ठिकाणी प्रसिद्ध केली.
१) मनपा संकेतस्थळ